सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर
# चपराक
■ पुणे ■ वर्ष : ५
■ अंक : ३७
■ पाने : ४
■ मूल्य : ३ ₹
संपादक : घनश्याम पाटील
Website :www.chaprak.com
■ सोमवार, दि. ०५ ते ११ ऑक्टोबर २०१५ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016
Licensed to post without prepayment of postage no. WPP - 14 Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 07/10/2015

KaMant masale
एकदा वापरून पहाच!
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

# साहित्य परिषदेला अध्यक्षांकडूनच चपराक

**महाराष्ट्र साहित्य परिषदेतील अंतर्गत राजकारण, कार्याध्यक्ष माधवी वैद्य यांचा गैरव्यवहार आणि समन्वयाचा अभाव यामुळे साहित्य परिषद म्हणजे पांढरा हत्ती झाला आहे. सातत्याने भ्रष्टाचार उघडकीस येऊनही कार्याध्यक्ष वैद्यबाई चुकीचे राजकारण करत असल्याचे सिद्ध झाले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध व्यवस्थापन तज्ज्ञ प्राचार्य डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपली नाराजी व्यक्त केली. कार्याध्यक्ष कसा दबाव आणतात हेही त्यांनी स्पष्टपणे नोंदवले. तसेच म.सा.प. चे साहित्य विषयक धोरण कसे असावे याबद्दलही त्यांनी आपले विचार परखडपणे व्यक्त केले. डॉ. शेजवलकर यांचे भाषण खास 'चपराक'च्या वाचकांसाठी देत आहोत.**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आदरणीय विश्वस्त आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेवर नितांत प्रेम करणारे माननीय सदस्य मित्रहो,

माझा अध्यक्षीय पदाचा कार्यकाल सुमारे सहा महिन्यांनी संपणार असल्यामुळे आणि त्याआधीची होणारी वार्षिक सभा माझ्या कार्यकाळात शेवटची असल्यामुळे मनात केलेले प्रकट चिंतन आपल्यापुढे सादर करीत आहे. हे करताना कोणत्याही व्यक्तिवर टीका करणे माझ्या स्वभावाला धरून नाही. आज मी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अध्यक्ष म्हणून तुमच्या समोर निवेदन करताना मला अतिशय दुःख होत आहे. माझ्या मनात कोणाबद्दल राग नाही. मात्र गेल्या काही दिवसात अनेक सदस्य मला भेटले आणि काहींनी मला पत्रेही पाठवली. त्यांच्याकडून कार्याध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर अनेकांनी नाराजी व्यक्त केली. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी गेल्या चार वर्षातला त्यांनी केलेला कारभार पाहता त्यांच्यामुळे म.सा.प.ची प्रचंड बदनामी झाली आहे. त्यामुळे परिषदेच्या सत्कीर्तीस प्रचंड हानी पोहोचली आहे. त्यांचा महामंडळाच्या अध्यक्ष म्हणून असलेला कारभारसुद्धा अत्यंत आक्रस्ताळेपणाचा आणि हटवादी आहे असे माझ्या कानावर आलेले आहे. घुमान आणि अंदमान येथे झालेल्या साहित्य संमेलनात जे गैरप्रकार झाले त्यालाही महामंडळाच्या अध्यक्षा याच जबाबदार आहेत असे मला वाटते.

गेल्या चार वर्षात अध्यक्ष म्हणून मला आलेला अनुभव हा देखील अतिशय क्लेषदायक आहे. आपल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सध्याच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष ही फक्त मानाची जागा असून अंतर्गत धोरणे आणि व्यवस्थापन इतर पदाधिकाऱ्यांच्या हातात आहेत असे मला माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर कार्याध्यक्षांनी लगेचच सांगितले. खरे म्हणजे त्यांचे सांगणे योग्य नव्हते. हे मलाही आणि इतरांनाही पटलेले नाही. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कारभाराबद्दल लक्ष घालणे हे अध्यक्षांच्या अधिकारात असते. जेव्हा जेव्हा अनेक सदस्यांकडून कार्याध्यक्षांबद्दल प्रचंड नाराजी असलेल्या तक्रारी माझ्याकडे येऊ लागल्या तेव्हा आपण स्वतः त्यात लक्ष घालावे असे मला वाटू लागले. माझ्या आधीचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी एकच वर्षांनंतर अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. ''विद्यमान कार्याध्यक्ष ज्या पद्धतीने वागत आहेत त्यामुळे अतिशय उबग येऊन मी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला'' असे मला मिरासदार यांनी स्पष्टपणे सांगितले होते. मी फारसे लक्ष न घातल्यामुळे कार्याध्यक्षांनी मनमानी कारभार सुरू केला. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात मलाही उद्दामपणा आणि अहंकार जाणवला. त्यातच त्यांनी जे गैरप्रकार केले त्याबद्दल काही सदस्य जे बोलले त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. महामंडळाच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी केलेला कारभारसुद्धा अतिशय चुकीचा आणि धक्कादायक होता. सासवड आणि घुमान येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्यावेळी त्यांनी छोटीशी संहिता लिहिल्याबद्दल भरपूर मानधन घेतले असे माझ्या कानावर आले आणि माझ्या मते ही त्यांनी केलेली अक्षम्य अशी चूक होती. चॅरिटी कमिशनर यांच्याकडून त्यांना चारवेळा नोटीस येऊनदेखील त्यांनी कागदपत्रे दिली नाहीत. त्यामुळे त्यांना चॅरिटी कमिशनरने पाच हजार रूपयांचा दंड केला. त्यांनी आणि सुनील महाजन यांनी चेकवर सह्या करून रोख पैसे काढले आणि ते संस्थेतर्फे भरले हे कितपत योग्य आहे ते तुम्हीच ठरवावे. कोषाध्यक्ष सुनील महाजन यांनीही दोन्ही संमेलनाच्या वेळी त्यांनी सादर केलेल्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे भरपूर पैसे घेतले असे मला सांगण्यात आले. या संबंधीचे पत्रही माझ्याकडे आले आहे. पदाधिकाऱ्यांनी लाभार्थी होणे योग्य नाही. कार्याध्यक्षांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या पाच उमेदवारांपैकी डॉ. श्रीपाल सबनीस या एका उमेदवारासाठी जाहीर प्रशस्ती दिली. हेसुध्दा योग्य झाले नाही. शरणकुमार लिंबाळे अध्यक्षीय उमेदवारीकरता फॉर्म भरावयास आले तेव्हा 'तुमचे नाव यादीतच नाही' असे कार्याध्यक्ष म्हणाल्या. त्यांनी जेव्हा पैसे भरल्याची पावती दाखवली तेव्हा कार्याध्यक्षांनी चूक मान्य केली. अनेकांनी माझ्याकडे अशाच प्रकारच्या तक्रारी केल्या. माननीय सदस्यांची अपेक्षा मात्र अध्यक्षांनी क्रियाशील रहावे असे वाटल्यामुळे ते मला अनेक प्रकारच्या सूचना करीत असतात. त्या जशाच्या तशा अमलात आणणे माझ्या हातात नसते. महामंडळावरसुद्धा आमच्यापैकी कोणी जावे या संबंधीची धोरणे आणि व्यवस्थापन इतर पदाधिकाऱ्यांच्या हातात आहेत असे मला माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर लगेचच सांगण्यात आले होते. त्यामुळे महामंडळाच्या कार्यात अध्यक्षांना, म्हणजे मला, सहभागी होता आले नाही. महामंडळाचे स्वतंत्र अस्तित्व आवश्यक आहे का, याबाबत अनेक सदस्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. महामंडळाच्या ऐवजी त्या त्या घटक संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी कामकाज बघावे असे अनेक सदस्यांना वाटते. त्यात कार्यकारिणीच्या तीन सदस्यांनी आणि त्याचबरोबर ज्येष्ठ साहित्यिकांपैकी दोन साहित्यिकांना स्वीकृत करून व्यापक स्थानिक समिती स्थापन करावी आणि या समितीने साहित्य संमेलने आयोजित करावीत असे अनेकांना वाटते. सध्या ज्या पद्धतीने पदाधिकारी निवडले जातात त्यामध्ये कार्याध्यक्ष, प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड थेट सदस्य करतात. अध्यक्षांची निवड मात्र कार्यकारिणी तर्फे केली जाते. त्यामुळे अध्यक्ष म्हणजे एक 'अडगळ' आहे असेच कार्याध्यक्षांना वाटत आले असावे. कधी कधी तर अध्यक्ष म्हणजे 'असून अडचण आणि नसून खोळंबा' असे वाटण्या इतपत आपण तेथे आहोत अशी भावना माझ्या मनात निर्माण झाली. कारण गेल्या चार वर्षात कार्याध्यक्ष आणि कोषाध्यक्ष काय व्यवहार करतात ते मला कधीही सांगण्यात आले नाही. मी शक्यतोवर परिषदेत येऊच नये असेच कार्याध्यक्षांच्या मनात असावे. परिषदेतील जाहीर कार्यक्रमांनादेखील कार्याध्यक्षाच अध्यक्ष म्हणून बसत. डॉ. सदानंद मोरे यांच्या सत्काराच्या वेळी मी आपणहून गेलो होतो तेवढेच. माझी अध्यक्षपदी नियुक्ती झाली तेव्हा आपण स्वतः कोणकोणत्या गोष्टी कराव्यात यासंबंधी मी काही योजना मनात मांडल्या होत्या. मात्र त्या मला अमलात आणता आल्या नाहीत. उदा. पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक अशा मराठी शाळांची अवस्था केविलवाणी झाली आहे आणि त्यामध्ये शासनाने सुधारणा करावी म्हणून साहित्य परिषदेने जोरात प्रयत्न करावा असे मला नेहमी वाटत आले आहे. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी या दृष्टीने प्रकाशकांनी ललित वाङ्मयांखेरीज इतर विद्याशाखातील विषयांची पुस्तके मराठीत प्रसिद्ध करावीत असे माझे मत आहे. महाविद्यालयीन तरूणांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे आकर्षित व्हावे यासाठी त्यांच्याकरता परिषदेने विशेष कार्यक्रम आयोजित करावेत म्हणजे नव्या पिढीचा मराठी साहित्य वाचण्याकडे ओढा राहील. अन्यथा आजच्या तरूण मुलांचे, सोशल मीडियामध्ये आणि मोबाईलचा वापर खूप वाढल्यामुळे, मराठी वाचन एकदम कमी झाले आहे. ज्या दिवशी तरूणांची हॉटेलकडे जाणारी पाऊले ग्रंथालयाकडे वळतील त्या दिवशी समाजाची योग्य दिशेने वाटचाल सुरू झाली असे म्हणता येईल. समाज काय वाचतो, त्या समाजातील विचारवंत काय बोलतात, काय लिहितात हे पाहणे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. आजचे साहित्य अनेकदा घाईघाईत लिहिले जाते. त्यामुळे शब्दरूपी शस्त्रे गंजत चालली आहेत. त्यांची धार बोथट झाली आहे. कन्नडमधील भैरप्पांच्या कादंबऱ्यांवर मराठीत उड्या पडतात. सुधा मुर्तींची अनुवादीत पुस्तके खपतात. मात्र आपल्याकडील मराठी साहित्य त्याप्रमाणात खपत नाहीत. महाराष्ट्रात एकही प्रकाशक एकाही लेखकाच्या कादंबरीची दहा हजाराची आवृत्ती प्रकाशित करू शकत नाही याचा विचार साहित्य परिषदेने केला पाहिजे. पण याही बाबतीत कार्याध्यक्षांनी मला काहीही करू दिले नाही.

सध्याचा जीवन कलह खूप वाढल्यामुळे आणि अनेकांची घरे यांच्या कचेऱ्यांपासून लांब असल्यामुळे ते घरी आल्यावर थकून जातात आणि मग त्यांचे वाचनच होत नाही. यावर काही उपाय सुचतात का याचा परिषदेने विचार करायला हवा. हल्ली मराठीतील अनेक मालिकांमध्ये वापरली जाणारी भाषा अशुद्ध असते. यावर देखील साहित्य परिषदेने अंकुश ठेवणे मला गरजेचे वाटते. साहित्य प्राज्ञ आणि साहित्य विशारद या परीक्षांकडे तरूणांचा ओढा कसा वाढेल यासाठी साहित्य परिषदेने महाविद्यालयात जाऊन या परीक्षा लोकप्रिय होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कार्याध्यक्षांनी याबाबतीत काहीही केले नाही. याचा विचार कार्याध्यक्षांच्या मनात का आलेला नाही याचे मला आश्चर्य वाटत आहे. म्हणून ज्येष्ठ साहित्यिकांचे एक सल्लागार मंडळ कार्यकारिणीने स्थापन करावे आणि त्यांचे मार्गदर्शन गंभीरपणे विचारात घ्यावे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यांच्या हातात अधिकार आहे त्यांनी इतरांचाही सल्ला घेऊन आपले धोरण अमलात आणावे. पान २ वर...



■ डॉ. माधवी वैद्य आणि सुनील महाजन यांनी गैरव्यवहार केला
■ प्रा. मिलिंद जोशी यांच्याबाबतचा निर्णय दुर्दैवी
■ प्रा. मिलिंद जोशी यांच्यासारख्या सदस्यांची परिषदेला गरज
■ अध्यक्ष म्हणजे 'असून अडचण, नसून खोळंबा'
■ वैद्यबाईंच्या दबावामुळे अध्यक्षीय कामकाज करता आले नाही

**– डॉ. प्र. चिं. शेजवलकर**
अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद

# परिषदेत बदल घडवा!

***अखिल*** भारतीय मराठी साहित्य संमेलनाची निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच साहित्य परिषदेच्या निवडणुकीचेही संकेत मिळाले आहेत. इच्छूक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सुरू केली असून त्याचे जोरदार पडसाद उमटत आहेत. साहित्य परिषदेच्या सर्वसाधारण सभेत परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी त्यांची कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांच्याकडून कशी कुचंबणा होत आहे हे परखडपणे सांगितले आहे. प्रा. द. मा. मिरासदार हे सुद्धा वैद्य बाईंच्या राजकारणाला कंटाळूनच परिषदेतून बाहेर पडल्याचे त्यांनी कबूल केले आहे. मिरासदारांनी राजीनामा दिल्यानंतर ‘चपराक’ने हे वास्तव वाचकांसमोर आणले होते. मात्र त्यावेळी द. मा. स्वतःच शांत राहिल्याने त्या विषयांवर फारशी चर्चा झाली नव्हती. शेजवलकरांनी ही कोंडी फोडल्यानंतर मिरासदारांनीही ते मान्य केले आहे.

माधवी वैद्य या कशा भ्रष्टाचाराच्या डबक्यात रूतत गेल्या आहेत, त्यांनी कसे सूडाचे राजकारण केले, त्यामुळे साहित्याची आणि साहित्य परिषदेची कशी हानी झाली हे ‘चपराक’ने सातत्याने वाचकांसमोर मांडले आहे. आता दस्तुरखुद्द अध्यक्षांनीच सर्वसाधारण सभेत तशी स्पष्ट भूमिका घेऊन ‘चपराक’च्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. त्यांनी फक्त घुसमट व्यक्त केली नसून या परिस्थितीतून कशाप्रकारे मार्ग काढता येईल हेही ठामपणे मांडले आहे. ‘महाराष्ट्रातील सुविख्यात व्यवस्थापन तज्ज्ञ’ अशी ओळख असलेल्या शेजवलकरांच्या बोलण्यातील तथ्य लक्षात घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई झाली पाहिजे.

मुळात महाराष्ट्र साहित्य परिषदेचा आणि साहित्याचा तसा फारसा संबंध राहिला नाही. नवोदितांच्या प्रतिभेला वाव मिळेल असे तिथे किंवा त्यामाध्यमातून काही घडत नाही. एकमेकांच्या कुचाळक्या करणे, मिरवण्याची हौस भागवून घेणे, मिळालेल्या निधीवर डल्ला मारणे, स्वतःची आणि स्वतःच्या कुटुंबीयांची तुंबडी भरणे हे व अशा प्रकारचे उद्योग तिथे खुलेआमपणे चालू असतात. तीन पानांची संहिता लिहिण्यासाठी तीस हजार रूपये, अनावश्यक विमानप्रवास, परिसंवादात जावयाची वर्णी, बालगोपाळांसाठी काढलेल्या दिवाळी अंकात स्वतःच्याच नातवंडांचे फोटो, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निवडणुकीसाठी उभे



असलेल्या उमेदवाराला प्रचारासाठी मदत, स्तुतीपाठक आणि भाटांचे हीत जोपासताना अस्सल प्रतिभावंतांची केलेली उपेक्षा या व अशा अनेक कारनाम्यातून डॉ. माधवी वैद्य यांनी त्यांचे गुण-अवगुण दाखवून दिले आहेत.

घुमानच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातही या बाईंनी संमेलनाध्यक्षांची अशीच उपेक्षा केली होती. व्यासपीठावर त्यांनी डॉ. सदानंद मोरे यांना चक्क मागे ढकलले आणि त्यांच्या पुढे येऊन राजकारण्यांच्या बाजूला थांबल्या. तेव्हा संमेलनात ‘महामंडळाच्या अध्यक्षांची नथ दिसली पण त्यामागचे नाक दिसले नाही’ या शब्दात आम्ही संमेलनाध्यक्षांची केविलवाणी अवस्था सांगितली होती. मात्र आपले लोकही निलाजरे आहेत. पद आणि प्रतिष्ठेसाठी कितीही अवमान सहन करतील. निवडून येण्यासाठी राजकारण्यांची चमचेगिरी करणारे, लाळघोटेपणा करणारे आणि निवडून आल्यानंतरही स्वाभिमान गहाण ठेवणारे असे अध्यक्ष मिळाल्यानेच मराठी भाषेची वाताहत झाली आहे.

श्रीपाल सबनीस यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर साहित्य परिषदेत एक पत्रकार परिषद घेतली. त्याचवेळी त्यांना पाठिंबा देण्यासाठी डॉ. सदानंद मोरेही तिथे आले होते. मागच्या वर्षी सबनीसांनी त्यांना पाठिंबा दिला असल्याने मोरेंनी यावेळी त्याची परतफेड केली हे उघड होते. ‘तू मला ओवाळ आता मी तुला ओवाळतो’ अशातला हा मामला होता. मात्र या परिषदेत पत्रकारांनी सबनीसांना विचारले की, ‘‘राजकीय मदत घेणार का?’’ त्यावर त्यांनी ‘‘साहित्यात कोणीही वर्ज्य नसते, मात्र मी माझे अवमूल्यन करून घेणार

**संपादकीय**

**घनश्याम पाटील - ७०५७२९२०९२**

नाही. राजकारणी व्यासपीठावर असले तर फरक पडणार नाही मात्र माझी खुर्ची कुणी ढकलत ढकलत मागे नेली तर ते मला चालणार नाही’’, अशा शब्दात सदानंद मोरे यांना टोलवले होते.

यावर्षीच्या साहित्य संमेलन निवडणुकीत पहिल्या फळीतील एकही साहित्यिक नाही. त्यामुळे संमेलनाध्यक्ष कोणीही झाले तरी मराठी भाषेला तसा काहीच फरक पडणार नाही. अर्थात, मोठा आणि कार्यक्षम लेखक संमेलनाध्यक्ष झाल्याने मराठीत आजवर काही मोठे परिवर्तन घडलेय असेही नाही. मात्र आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकर असे प्रतिभावंत ज्या खुर्चीवर बसले होते तो वारसा फारच भुक्कड लोकांकडे येऊन ठेपला आहे. नाहीतर फ. मुं. शिंदे सारखे किरकोळ प्रतिभेचे अनेक हौसी नकलाकार संमेलनाध्यक्ष झालेच नसते. या पदाची प्रतिष्ठा कधीच लयास गेली आहे. आता केवळ एक सोपस्कार उरलाय. ‘नेमेचि येतो पावसाळा’ याप्रमाणे संमेलने पार पडत आहेत. त्यापासून मराठी भाषेला, मराठी माणसाला नक्की काय मिळते याचा विचार करण्याची वेळ आली आहे. भालचंद्र नेमाडे यांच्यासारखा लेखक ‘साहित्य संमेलन म्हणजे रिकामटेकड्यांचा उद्योग’ असे विधान करतो. त्याला साहित्यातील अशा प्रवृत्ती कारणीभूत आहेत.

असो! असे म्हणतात की, माणसाने हजार चुका कराव्यात; मात्र एकच चूक हजारवेळा करू नये! माधवी वैद्य यांच्या राजकारणाचे बळी ठरलेल्या प्रा. मिलिंद जोशी यांच्याविषयी डॉ. शेजवलकरांनी गौरवोद्‌गार काढले आहेत. जोशी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हावेत, अशी अपेक्षाही शेजवलकरांनी यापूर्वीच व्यक्त केली होती. मिलिंद जोशी परिषदेतून बाहेर पडल्यानंतर परिषदेचे वाटोळे झाले हेही त्यांनी सूचित केले आहे. प्रशासनावर पकड असलेला, स्वतः साहित्यिक आणि फर्डा वक्ता असलेला जोशी यांच्यासारखा नेता परिषदेला मिळाला तरच काहीतरी आशादायक चित्र दिसू शकेल. येणाऱ्या निवडणुकीत मिलिंद जोशी यांनी पुन्हा सक्रिय व्हावे आणि परिषदेला गतवैभव प्राप्त करून द्यावे, अशी भूमिका डॉ. शेजवलकर यांच्यासारख्या अभ्यासू, व्यवस्थापन क्षेत्रात मानदंड ठरणाऱ्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या सद्‌गृहस्थाने घेतली आहे. त्याचे समर्थन करायलाच हवे.

माधवी वैद्य, सुनील महाजन यांनी परिषदेची, महामंडळाची आणि एकूणच साहित्य क्षेत्राची केली तेवढी शोभा पुरे झाली. आता यात परिवर्तन घडावे आणि साहित्य क्षेत्रात मराठीचा विजयध्वज सर्वत्र डौलात फडकावा, एवढीच यानिमित्ताने माफक अपेक्षा!

■ ■

## साहित्य परिषदेला अध्यक्षांकडूनच चपराक

***पान १ वरून...*** मराठी समाजाला अंतर्गत दुहीचा एक प्रकारचा शाप मिळालेला आहे. तो कमी होण्यासाठी विविध स्तरातील लोकांना साहित्य परिषदेकडे आकर्षित केले पाहिजे. आता दलित समाजातील अनेक नवे लेखक आणि कवी नावारूपाला आले आहेत. याचप्रमाणे श्रमिक वर्गातही अनेक साहित्यिक आहेत. त्यांचा सहभाग आपण वाढवायला हवा. या बाबतीतही कार्याध्यक्षांनी माझी मते कधीही जाणून घेतली नाहीत.

माझ्या कार्यकाळात प्राध्यापक मिलिंद जोशी यांचा प्रमुख कार्यवाह पदाचा राजीनामा ही एक दुर्दैवी घटना घडली याचे मला फार वाईट वाटले. मिलिंद जोशी हे प्रसिद्ध साहित्यिक, उत्तम वक्ते आणि प्रशासकीय जाण असलेले प्राध्यापक आहेत. त्यांचा सहभाग परिषदेला उपयोगी पडला असता. त्यांनी पुढील निवडणुकीनंतर साहित्य परिषदेत पुन्हा पदार्पण करावे असे मला मनापासून वाटते. कोणाशीही दीर्घकाळ दुरावा ठेऊ नये, हे मी यशस्वी नेतृत्व करणाऱ्या अनेकांपासून शिकलो. स्वामी विवेकानंद, येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साने गुरूजी यांच्या विचारांचा माझ्यावर प्रभाव आहे. त्यामुळे जे काही माझ्या वाट्याला काम आले ते मानसिक ताण न ठेवता प्रसन्न मनाने जेवढे करता येईल तेवढे करावे अशीच माझी धारणा आहे. त्यामुळेच इतर सामाजिक संस्थांमध्ये आणि पुणे विद्यापीठातही बिनविरोध निवडून येऊन आणि सगळ्यांची मने जिंकून मला काम करता आले. त्या मानाने महाराष्ट्र साहित्य परिषदेत मला स्वतःला अपेक्षित असलेले माझे योगदान मला नीट करू देता आले नाही. कारण येथेही कार्याध्यक्षांनी मला जाणूनबूजून एखाद्या खड्ड्यासारखे दूर ठेवले. सर्वांची नाराजी पत्करून कार्याध्यक्षांनी गैरकारभार करीत राहणे कितपत योग्य आहे याचा त्यांनी स्वतः विचार करावा असे मला वाटते. काहीजण डॉ. माधवी वैद्य यांच्याविरूध्द अविश्वासाचा ठरावही मांडणार होते; पण त्यासाठी पंधरा दिवसाची नोटीस द्यावी लागते. डॉ. माधवी वैद्य यांनीच आता सदस्यांचा आणि अध्यक्षांचा विश्वास बसण्यावर आपण पात्र आहोत का याचा विचार केला पाहिजे. कार्याध्यक्षपदी खरे म्हणजे नामवंत साहित्यिक असावा पण तसे झालेले नाही.

सध्याच्या कार्याध्यक्षांचे साहित्यिक योगदान नगण्य आहे हे खेदाने म्हणावेसे वाटते. मंगला गोडबोले, अच्चुत गोडबोले, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अशोक कामत, डॉ. अरूणा ढेरे ही व अशी नामवंत साहित्यिक मंडळी कार्याध्यक्षपदी शोभून दिसली असती. गेल्या वर्षभरात विश्वस्तांची एकही सभा बोलावण्यात आली नाही. विश्वस्तांची सभा घेण्यासंबधी कोषाध्यक्षांनी मला एक पत्र लिहिले होते. मी त्यांना तारखाही दिल्या होत्या पण पुढे काय झाले हे मलाही कळले नाही. असो.

१९५३ मध्ये, म्हणजे ६२ वर्षांपूर्वी, त्यावेळी माझे निवासस्थान साहित्य परिषदेच्या जवळ असल्यामुळे, मी नियमितपणे वृत्तपत्रे आणि मासिके वाचण्याकरता परिषदेत येत होतो आणि परिषदेच्या त्यावेळच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहत होतो, तसेच १९५६ मध्ये म्हणजे एकोणसाठ वर्षांपूर्वी मी कै. गं. भा. निरंतर यांच्या प्रेरणेने आणि कै. म. श्री. दीक्षित यांच्या पाठींब्यामुळे साहित्य परिषदेच्या परीक्षा दिल्या, त्याच साहित्य परिषदेमध्ये आपण सर्वांनी मला अध्यक्षपदी नियुक्त केले याची कृतज्ञतेने मला आज आठवण येत आहे. मराठी हा माझा आवडता विषय असल्यामुळे मी तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्र साहित्य परिषदेला दैवत मानत आलेलो आहे.




**मासिक साहित्य चपराक**

ऑक्टोबर २०१५

- दुष्काळग्रस्तांच्या मदतीला पुणेकरांची धाव!/ **घनश्याम पाटील**
- मलमपट्टी नाही, व्यापक कार्यक्रम करणार/ **मकरंद अनासपुरे**
- अशी माणसं, असे ऋणानुबंध / **महेश मांगले**
- रद्दीतून ११२ विद्यार्थी बुद्धिकडे / **प्रसाद प्रभू**
- सात्विक प्रतिभावंत पंढरीनाथ कोल्हापुरे / **चंद्रलेखा बेलसरे**
- रेघोट्यांच्या प्रदेशात / **समीर नेर्लेकर**
- सणवार, व्रतवैकल्य आणि आपण / **आसावरी इंगळे**
- आठवणीतील पाने / **संजय वाघ**
- जागर महापुरुषांचा / **अरुण कोटगी-बेनाडीकर**
- सम्राट चंद्रगुप्त मौर्य / **संजय सोनवणी**
- संघर्ष (कथा) / **मनिषा वाणी**
- **ग्रंथ परिचय**

सोळा भाषणे : महेश मांगले — बाळासाहेब एक अंगार : उद्धव भयवाळ

माणिकमोती : महादेव कोरे — गावमाती : विकास पांढरे

- **काव्यपुष्प**

सविता करंजकर, धाराशिव — मुरारीभाऊ देशपांडे, संगमनेर — विनिता कुलकर्णी/पाटील

रमेश पां.जाधव, पुणे — अशोक भांबुरे, पुणे — भालचंद्र कोळपकर, नान्नज

महेश मांगले, पुणे — विद्या बयास, शिरुर ताजबंद — संध्या देशमुख, पुणे

**वार्षिक वर्गणी रु. ५०० फक्त**

**संपर्क : ०२० २४४६०९०९**

# बुडलेल्यांचा काडीचा आधारही गेला

**जनलोकपाल** आंदोलनापासून त्याचे प्रणेते व म्होरके नेहमी उठसुट गांधी स्मारक असलेल्या राजघाटावर जाऊन बसायचे. उपोषणाच्या आधी अण्णा हजारे यांनी तिथे बसून काहीकाळ मौनव्रत घेतले होते. तर कुणा कार्यकर्त्याने थप्पड मारली म्हणून केजरीवालही एकदा राजघाटावर जाऊन बसले होते. आज चार वर्षांनी गांधी जयंतीच्या मुहूर्तावर त्याच लोकांची कृती गांधी विचारांना कितीशी सुसंगत आहे? गांधीजयंतीचा मुहूर्त साधून आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी महाराष्ट्र व मुंबई येथील पक्षाच्या शाखा बरखास्त करून टाकल्या आहेत. त्यामुळे अर्थात मुंबईतले नुसत्या नावाचे मयंक गांधी खवळले आहेत आणि त्यांनी केजरीवाल यांच्यावरच पक्ष रसातळाला घेऊन जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. यात कोण खरा वा चुकीचा, हे आपण ठरवू शकत नाही. जिसकी लाठी उसकी भैस हाच ज्यांचा नियम असतो, त्यांनी कितीही लोकशाही वा गांधींजींचा नामजप केल्याने वास्तव बदलत नसते. केजरीवाल कधीही लोकशाहीवादी नव्हते. कारण त्यांचा एकांगी स्वभाव राहिलेला आहे. त्यामुळे अन्य पक्षांवर कितीही आरोप केले, तरी त्यांनाही त्याच मार्गाने जाणे आवश्यक होते. पक्ष चालवणे म्हणजे लोकशाहीची चर्चा करणे नसते. तिथे सहमतीने निर्णय घेण्याची कल्पना खूप आकर्षक असली, तरी व्यवहारात एकमत वा सहमती अशक्य असते. तिथे कोणीतरी आपले मत लादणारा आवश्यक असतो. केजरीवाल यांच्यापाशी तो 'दुर्गुण' आहे. म्हणूनच जनलोकपाल आंदोलनापासून आजपर्यंत त्यांच्या अन्य सहकाऱ्यांपेक्षा तेच यशस्वी झालेले दिसत आहेत. आरंभीच्या काळात त्यांनी जी सहमतीची नाटके रंगवली. ती लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी होती. त्यातून आपण लोकशाहीवादी असल्याचा आभास निर्माण करून माध्यमांकरवी आपली एक उजळ प्रतिमा केजरीवाल यांना निर्माण करायची होती. आता त्या नाटकांची गरज उरलेली नाही.

मागल्या लोकसभा निवडणुकीत एकाएकी देशभर उमेदवार उभे करण्याचा निर्णय कुणाच्या सहमतीने झाला होता? कुठेही कुणालाही उमेदवारी देताना, काय निकष वा कसोटी वापरली गेली होती? कोणालाही पक्षात घेताना वा नेतापद बहाल करताना, कुठल्या सहकाऱ्यांशी केजरीवाल विचारविनिमय करीत होते? पण देखावा असा उभा केला होता, की सर्वकाही सहमतीने चालू होते. बाकीचे सहकारी केजरीवाल यांची प्रतिमा पक्षाला लाभदायक ठरेल, म्हणून निमूट बसले होते; पण जेव्हा बाहेरच्यांना गप्प करण्यात केजरीवाल यशस्वी ठरले. त्यानंतर त्यांनी आपल्याच एक एक सहकाऱ्यांचा बळी घ्यायला सुरूवात केली. शिसोदिया व केजरीवाल सोडून मुळच्या जनलोकपाल आंदोलनातील कोण त्यांच्यासोबत शिल्लक उरले आहे? कालपरवा पक्षात थेट उमेदवार व्हायला आलेले आशुतोष वा आशिष खेतान यांच्यासारखे लोक हुकूमत गाजवत आहेत. कुमार विश्वास, प्रशांत भूषण, शाझिया इल्मी असे तमाम लोक कुठल्या कुठे दूर फेकले गेलेत. मयंक गांधी वा अन्य महाराष्ट्र मुंबईतील आप नेत्यांसाठी तोच इशारा होता वा असतो. निमूटपणे हुकूमत मान्य करायची. जमणार नसेल, तर पक्ष सोडून निघून जायचे. गेला नाहीत, तर गठडी वळली जाईल. हेच इतरांच्या बाबतीत झाले होते. मग मयंक गांधी कसल्या प्रतिक्षेत होते? गांधी जयंतीदिनी आपल्याला बरखास्त करायची वाट बघत बसले होते काय? नितीन गडकरींपासून कपिल सिब्बल यांच्यापर्यंत अनेकांना लोकसभा निवडणूकीपुर्वी भ्रष्ट घोषित करणारे केजरीवाल पुढे दारूवाले, बारवाले, बिल्डर, गुन्हेगारांना दिल्लीतली उमेदवारी देत गेले. त्यातून आदर्शवादी पक्ष उभा रहातोय, अशा समजूतीत मयंक गांधी होते काय? यापेक्षा आम आदमी पक्षात काहीही वेगळे होणे अपेक्षित नव्हते आणि होणारही नाही. निव्वळ ब्लॅकमेल हे हत्यार घेऊन जो माणूस सार्वजनिक जीवनात येतो, याच्याकडून कुठल्या आदर्शाची अपेक्षा बाळगता येईल?

आपल्या पहिल्या शपथविधीच्या वेळी केजरीवाल यांनी रामलिला मैदानावरून उपस्थितांना केलेले आवाहन बोलके होते. कोणी लाच मागितली तर नाही म्हणू नका. अशा अधिकारी सरकारी कर्मचाऱ्यांशी सौदा पक्का करा आणि तो करीत असताना खिशातल्या मोबाईलवर त्याच्या बोलण्याचे रेकॉर्डींग करून घ्या. त्याचा पुरावा घेऊन आलात तर आपण लाचखोरी बंद करून दाखवतो, असे आश्वासन केजरीवाल यांनी दिलेले नव्हते काय? त्यातून ते जनतेला काय शिकवत होते? अशा रितीने कोणालाही सापळ्यात अडकवले, मग त्याच्यावर कारवाई कशाला करायची? रेकॉर्ड करणाराच त्याला नुसती हुलकावणी देऊन खंडणी उकळू शकतो ना? विविध प्रकारच्या क्लिप्स युट्युबवर येतात वा नेटवर टाकल्या जातात, त्यापेक्षा केजरीवाल यांचे आवाहन कितीसे वेगळे होते? याला कोणी गांधीवाद म्हणणार आहे काय? आशुतोष वा खेतान यांनी अशाच उठवळ पत्रकारितेत त्यातूनच नाव कमावले आणि तेच केजरीवाल यांचे उजवेडावे हात झाल्यावर दुसरे काय व्हायचे होते? त्याचाच प्रयोग मग एकेदिवशी योगेंद्र यादव यांच्यावर झाला आणि त्याचाच उपयोग कुणी केजरीवाल यांचेच फोनवरील शिवीगाळ रेकॉर्ड करण्यात झाला. आपल्याच ज्येष्ठ सहकाऱ्यांना कमिने वगैरे सन्मान्य बिरूदे लावणाऱ्या केजरीवाल यांच्याकडून आदर्श राजकारण वा समाजकारणाची अपेक्षा कोणी गुंडही करणार नाही. अशा व्यक्तीने काढलेल्या पक्षात आज तीन आमदार कायदेशीर जाळ्यात फसले आहेत. कोणावर खोट्या प्रमाणपत्राचा आरोप आहे, तर कोणावर पत्नीला हुंड्यासाठी छळल्याचा आरोप आहे. त्यापैकी एक माजी मंत्री आणि दुसरा विद्यमान मंत्री असताना पकडले गेले. यातून केजरीवाल यांची संगत कळते. हे जनलोकपाल आणून देशातला भ्रष्टाचार संपवणार होते? अण्णा कमी शिकलेले असले तरी त्यांच्यापाशी अधिक व्यवहारी म्हणूनच विवेकी बुद्धी असावी. त्यांनी आरंभीच त्यापासून फारकत घेतली.



किचड साफ करना है तो किचडमे उतरनाही पडेगा, हे केजरीवाल यांचे प्रसिद्ध वाक्य आहे, जे त्यांनी अण्णांनाच ऐकवले होते. जनलोकपालसाठी राजकारणात जायचे केजरीवाल यांनी ठरवले आणि अण्णांनी त्याला विरोध केला, तेव्हाचे हे वाक्य आहे. असे लोक किचड म्हणजे चिखलात जात नाहीत तर खातेऱ्यात रममाण होतात, हे अण्णांना पक्के ठाऊक होते. म्हणूनच त्यांनी केजरीवाल यांच्यापासून वेळीच फारकत घेतली; पण बाकीचे अत्यंत सुशिक्षित व अभ्यासू बुद्धीमान लोकपालवादी अरविंद केजरीवाल यांच्या जाळ्यात फसते गेले आणि आम आदमी पक्षाच्या लोकप्रियतेचा लाभ उठवण्याच्या खातेऱ्यात उड्या मारत गेले. मेधा पाटकर यांनाही त्या मोहापासून दूर रहाणे शक्य झाले नाही. त्यांच्यापेक्षा मयंक गांधी यांचा अनुभव मोठा नाही. केजरीवाल पहिल्या दिवसापासून साधूसंत असल्याचे नाटक करीत होते आणि त्यामध्ये नवनवे रंग भरण्यासाठी साधेपणा, शुचिता यांचे तमाशे करीत होते. त्यातले ढोंग सामान्य माणसाला दिसू शकत होते. अण्णा ते ओळखू शकले. यादव, भूषण वा मयंक गांधींना बुद्धीमान असल्याने ते सत्य बघता आले नाही. मग त्याचे परिणाम त्यांना भोगावेच लागणार ना? महाराष्ट्रात मुळात आम आदमी पक्ष होताच किती? पुर्वीच्या कालबाह्य झालेल्या बुडालेल्या समाजवादी वा पुरोगाम्यांनी काडीचा आधार म्हणून आपचा आश्रय घेतला होता. लोकसभा निकालांनी त्यांना सत्य दाखवले, तरी बघता आले नाही आणि पुढल्या निवडणूका लढायच्या नाहीत, असा फतवा काढून केजरीवाल सत्य दाखवत असताना त्यांना ते बघायचे नाही. मग त्यांनाच भ्रमातून बाहेर काढण्यासाठी केजरीवाल यांना ठाम कारवाई करावी लागणार ना? त्यांनी बुडालेल्यांना वाटणारा काडीचा आधारही काढून घेतला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत निदान केजरीवाल यांचा निर्णय योग्य म्हणावा लागेल. नसलेला पक्ष त्यांनी बरखास्त करून तो नसल्याचे सिद्ध केले.

– भाऊ तोरसेकर
९७०२१३४६२४

## झलक – 'साहित्य चपराक' दिवाळी विशेषांक २०१५

### तीन सारांश कथा

कथा हा अतिशय लवचिक असा वाङ्मयप्रकार आहे. संस्कृतिच्या प्रारंभापासून कविता आणि कथा लिहिल्या जातात. पुढे नाटक आले. म्हणजे साहित्याचे हे मूळ अविष्कार रूपे होत. कथा ही लवचिक असल्यामुळे ती असंख्य रुपात व्यक्त झालेली आहे. होऊ शकते. लघुत्तम कथा, लघुकथा, गोष्ट, कथा, दीर्घकथा, धक्कांतिका अशा विविध रुपात कथा लिहिली गेली. कमीत कमी अवकाशात खूप काही सूचित करण्याचे सामर्थ्य कथा या वाङ्मय प्रकारात असते. शिवाय काही अनुभवच असे असतात की, कथेशिवाय ते इतरत्र व्यक्त होऊच शकत नाहीत. एक प्रकारची अपरिहार्यताच तेथे असते. 'चपराक दिवाळी अंक २०१५' मध्ये 'सारांश कथा' हा एक प्रयोग केला आहे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी! कमीत कमी अवकाशात अधिकाधिक वास्तव गोळीबंदपणे प्रकट करण्याचा हा प्रयत्न आहे.

### अशी ही साताऱ्याची तऱ्हा!

अजिक्यतारा किल्ल्याच्या कुशीत वसलेलं, प्राचीन, ऐतिहासिक वारसा लाभलेलं, 'सातारा' हे दक्षिण महाराष्ट्रातलं महत्त्वाचं शहर! छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचं तोरण बांधलं ते याच भूमितल्या रायरेश्वरच्या पठारावर! अफझलखानाचा वध छ. शिवरायांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी केला. स्वराज्याच्या सीमा अरबी समुद्रापर्यंत भिडवल्या. त्या ऐतिहासिक घटनेची साक्षीदार असलेली भूमी हीच!

साताऱ्याचे लोकजीवन, संस्कृती, इतिहास, राजकारण, वेशभूषा, खाद्य संस्कृती याविषयी अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे ज्येष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी यांनी.

### मराठवाड्यातील खाद्यसंस्कृती

अश्मयुगीन कालखंडापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंत मानवाच्या जीवनात वेगवेगळे बदल होत गेले. संस्कृती बदलल्या. जीवनमान बदलले. अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गरजा मात्र कधीच बदलल्या नाहीत. गरजांचे स्वरुप फक्त बदलले. कंदमुळे खाणारा आदिमानव आणि विविध पदार्थ चवींनं खाणारी आजची पिढी या दोन बिंदूच्या मध्ये असलेला भक्कम खाद्यप्रवास निश्चितच रंजक, ज्ञानवर्धक आणि विशेषतः भूकवर्धक आहे.मराठवाड्याच्या संपन्न खाद्य प्रवासाचा आढावा घेतला आहे नांदेड येथील कवयित्री आणि लेखिका ज्योती कदम यांनी.

### रद्दीवाला आणि बारवालाही संमेलनाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत!

सध्या संमेलनाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत जो तो उठतोय व अर्ज भरतोय आणि आपला साहित्याशी कसा संबंध आहे हे सांगतोय. इथून पुढे रद्दीवाले आणि बारवालेही अर्ज भरायला कमी करणार नाहीत. तेही आपला साहित्याशी असलेला संबंध सांगतील. संमेलनाच्या समकालीन वास्तवावर खुसखुशीत भाष्य करणारा प्रा. मिलिंद जोशी यांचा विशेष लेख.

### चौथं पोट (व्यंग्यकथा)

आपल्या राज्यकर्त्यांना खा खा चा भस्म्या रोग झालाय. यांनी कितीही खाल्लं तरी यांची भूक काही शमत नाही. यांनी जमिनी पचवल्या. डोंगर गिळले. योजना हडप केल्या तरी यांचे पोट भरत नाही. निसर्गाने दिलेल्या पोटाला असे काय आणि किती लागणार? पण यांनी हे सारे पचवण्यासाठी नवनवी पोटे शिवून घेतली. या व्यवस्थेचे डोळसपणे चित्रण करणारे सुप्रसिद्ध लेखक, नामवंत पत्रकार ह. मो. मराठे यांनी हाच धागा पकडून एक खास व्यंग्यकथा लिहिली आहे 'साहित्य चपराक'च्या दिवाळी अंकासाठी. आपल्या निढावलेल्या आणि भ्रष्ट नेत्यांचा खरा चेहरा दाखवणारी ही कथा यंदाच्या 'चपराक' दिवाळी अंकात अवश्य वाचा.

### पांढरे हत्ती

शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचाराचं मोठं कुरण निर्माण झालं आहे. शिक्षणसम्राटांची बकासुरी भूक डोनेशनमधून शमत नसल्याने ते वाटेल ती मनमानी करत असतात. अशाच एका शिक्षणसंस्थेच्या महाविद्यालय ते मॉल या प्रवासाचे आणि त्या प्रवासातील जीवघेण्या, सुन्न करणाऱ्या संघर्षाचे प्रभावी चित्रण करणारी सुप्रसिद्ध साहित्यिक रवींद्र शोभणे यांची 'पांढरे हत्ती' ही कादंबरी जानेवारी २०१६ मध्ये नागपूरच्या 'विजय प्रकाशन'तर्फे प्रकाशित होत आहे. या कादंबरीची झलक दाखवून देणारे एक खास प्रकरण वाचा 'चपराक दिवाळी विशेषांक २०१५' मध्ये.

पूर्व नोंदणीसाठी संपर्क :
**'चपराक प्रकाशन'**
६१७, 'साईकृपा', शाहू गणपतीसमोर, शुक्रवार पेठ, पुणे ०२.
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

# शहरी लोकांचा आणि योगीराज पतसंस्थेचा अभिमान वाटतो : मकरंद अनासपुरे

## ■ योगीराज भूषण पुरस्काराचे वितरण; दुष्काळग्रस्तांना मदत




**पुणे (प्रतिनीधी):**
नाम ही संस्था सगळ्यांचीच संस्था आहे. ही कुणाची वैयक्तिक संस्था नाही. मी व नाना पाटेकर हे निमित्तमात्र आहोत. या कामाबद्दल बरंवाईट बोललं जाईल; पण प्रथम आम्ही करून दाखवू व मगच त्यावर बोलू. आता हे सर्व कार्य जाहीर करण्याचे कारण हे की ही लोकचळवळ व्हावी असे आम्हाला वाटते. शहरी भागातले लोक, योगीराज पंतसंस्थे सारख्या संस्था, ज्ञानेश्वरभाऊ तापकीरांसारखी माणसं मदतीसाठी पुढं येताहेत याचा मला अभिमान वाटतो, असे मत प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी व्यक्त केले.

योगीराज नागरी सह. पतसंस्थेतर्फे दिला जाणारा 'योगीराज भूषण पुरस्कार' या वर्षी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी व दुष्काळग्रस्तांसाठी सुरू केलेल्या कामाबद्दल मकरंद अनासपुरे यांना देण्यात आला. यावेळी 'नाम फाउंडेशन'साठी योगीराज पतसंस्थेतर्फे पाच लाख रूपयांचा मदत निधी देण्यात आला. यामध्ये पतसंस्थेच्या संचालक व कर्मचाऱ्यांनीही मदत केली तसेच इतर लोकांकडून मिळालेली अठरा लाखाची मदतही मकरंद अनासपुरे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. या कार्यक्रमात खासदार राजू शेट्टी, खासदार श्रीरंग बारणे, राज्यमंत्री दिलीप कांबळे, आमदार मेधा कुलकर्णी, भानुप्रताप बर्गे, आमदार सदाभाऊ खोत, मदन बाफना, दत्तात्रय गायकवाड, रामभाऊमोझे, जया शेट्टी, संस्थापक ज्ञानेश्वरभाऊ तापकीर, राजेंद्र मुरकुटे, शंकरराव सायकर, वसंतराव माळी, गणेश तापकीर, अमर लोंढे, राजेश विधाते आदी मान्यवर उपस्थित होते.

अनासपुरे म्हणाले, ही मदत जरी तात्पुरती मलमपट्टी असली तरी त्याबाबत एक व्यापक कार्यक्रम सुरू झालेला आहे. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही सत्तावीस-अठ्ठावीस वर्षीय तरूण शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागते ही आपली शोकांतिका आहे. यामागे काय कारणं आहेत याचा तज्ज्ञांनी अभ्यास करावा. ही अपमानीत जीवनाची प्रतिक्रिया आहे. मदत करणे ही एक प्रवृत्ती आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी अपले स्कील या सकारात्मक कार्यक्रमासाठी देऊन मदत करावी. प्रत्येक समस्येला तोडगा आहे. लोकांनी आम्हाला असे पर्याय सुचवावे, सूचना कराव्यात. माणसांनी माणसासाठी माणुसकीतून केलेलं हे कार्य आहे. ज्यांची भूक भागली आहे, ज्यांची पोटे आता भरलेली आहेत त्यांनी या कार्यासाठी सढळ हाताने मदत करावी. असे आवाहन अनासपुरे यांनी यावेळी केले.

यावेळी खासदार राजू शेट्टी म्हणाले, आम्ही सर्व वस्तू कितीही पैसै देऊन विकत घेतो पण शेतीमाल हा कवडीमोल भावाने विकत घेतो. यात शेतकरी मेला तरी कोणाला काहीच फरक पडत नाही. फक्त पैशाची मदत करून चालणार नाही तर समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. वीजेचे कनेक्शन मिळालं नाही म्हणून, सावकाराच्या अपमानामुळं शेतकरी आत्महत्या करतायत, हे सिस्टिमचे बळी आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची वाताहत होत आहे. चांगलं कार्य करणाऱ्यांना ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांच्यासारखे लोक भरभरून मदत करतात. शेतकरी स्वत:च्या पायावर कसे उभे राहतील, त्यांना भीक मागायला लागणार नाही यासाठी या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे.

राज्यमंत्री दिलीप कांबळे म्हणाले, शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे. त्यासाठी अनेक कार्यक्रम राबवले जात आहेत. शेतकऱ्यांची जगण्याची, लढण्याची इच्छा जगवली पाहिजे. त्यासाठी कार्य व्हायला हवे. शहरी भागात पाण्याचा काटकसरीने व योग्य तेवढाच वापर केला पाहिजे.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. योगीराज नागरी पतसंस्थेतर्फे यावेळी दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे, ज्येष्ठ नागरिक संघाचे व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. योगीराज पतसंस्थेतर्फे दहा गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले. योगीराज पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ तापकीर यांनी प्रास्ताविक केले. कवी माधव गिर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## विकास पाटील सलग तिसऱ्यांदा 'इम्फा'चे संचालक

**पुणे, (प्रतिनिधी)** : सिनेमा-टीव्ही क्षेत्रात मानाच्या मानल्या जाणाऱ्या 'इम्फा'ची (इंडियन मोशन पिक्चर प्रोड्युसर्स असोसिएशन) वार्षिक निवडणूक नुकतीच झाली. यामध्ये टी. पी. अगरवाल पॅनेलचा विजय झाला असून, त्याअंतर्गत पुण्याच्या विकास पाटील यांची संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पाटील यांना सलग तिसऱ्या वर्षी विजय मिळाला आहे.



टी. पी. अगरवाल यांची अध्यक्षपदी तर विनयकुमार सिन्हा यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. 'इन्फा'मध्ये प्राइम कॅटेगरी, असोसिएट्स मेंबर आणि टीव्ही प्रोड्युसर या तीन विभागांमध्ये निवडणूका होतात. यामध्ये टी. पी. अगरवाल यांच्या पॅनेलने बहुमत मिळवले असून २३ पैकी १९ जागा पटकावल्या आहेत. अगरवाल यांच्या सोबत के. सी. बोकडीया यांचे पॅनेल निवडणुकीत उतरले होते.

पाटील यांनी 'सप्तदेवता चित्र' या बॅनरअंतर्गत 'मन्या सज्जना', 'हसत-खेळत' या सिनेमांची, तर 'उलट-सुलट' या मालिकेची निर्मिती केली आहे. 'सलग तिसऱ्या वर्षी निवड झाल्यानं आनंद होतोय. ही निवड तीन वर्षांसाठी असून, येत्या वर्षांत 'इन्फा'च्या नावाने मोठा पुरस्कार सोहळा सुरू करण्याचे नियोजन आहे,' असे पाटील यांनी सांगितले.

## झलक - 'साहित्य चपराक' दिवाळी विशेषांक २०१५

### ध्येय अमुचे हे ठरले; कार्य दुसरे ना उरले! अर्थात पुरोगामी चळवळीचे मारेकरी!!

लोकसभा निवडणुका संपून आता दीड वर्षाचा कालावधी उलटला आहे आणि त्यात नरेंद्र मोदी यांनी भाजपाचे नेतृत्व करताना कॉंग्रेसचा ऐतिहासिक पराभव घडवून आणला. नुसता त्या पक्षाचा तो पराभव नव्हता तर स्वातंत्र्य चळवळ व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय क्षितीजावर तळपत असलेल्या नेहरू-गांधी प्रणित तथाकथित सेक्युलर वा पुरोगामी विचारसरणीचा तो दारूण पराभव होता. मात्र इतके होऊनही अजून कोणी त्याचा गंभीरपणे अभ्यास केलेला नाही; किंबहुना त्या निकालांची गंभीर दखलसुद्धा घेतली गेलेली नाही. उलट जुनेपाने संदर्भ देवून अशा पराभवातून कॉंग्रेस अनेकदा कशी सावरली आहे, त्याचे दाखले देण्याची पळवाट शोधण्यात जाणत्यांनी धन्यता मानलेली आहे. इथे 'जाणते' म्हणजे फक्त कॉंग्रेस पक्षातले जाणते व अभ्यासू नेते असेच म्हणायचे नाही; तर स्वत:ला राजकीय विश्लेषक वा पुरोगामी विचारांचे समर्थक मानल्या जाणाऱ्या पत्रकार-संपादक व लेखकांचाही त्यामध्ये समावेश आहेच! पण त्याच्याही पलीकडे जे अन्य पुरोगामी पक्ष वा संघटनेशी संबंधित आहेत, त्यांचाही याच जाणत्यांमध्ये समावेश होतो. अशा तथाकथित तमाम पुरोगाम्यांनी मोदींचा विजय केवळ निवडणुकीतला विजय मानून त्याकडे केलेला कानाडोळा त्यांच्या बेफिकीरीचे लक्षण नाही, तर बौद्धिक दिवाळखोरीची साक्ष आहे.



**भाऊ तोरसेकर यांचा विशेष लेख.**

### दिवाळी विशेषांक २०१५ चे मानकरी

महाराष्ट्र भूषण बाबासाहेब पुरंदरे, भाऊ तोरसेकर, ह. मो. मराठे, नागनाथ कोत्तापल्ले, प्राचार्य प्र. चिं. शेजवलकर, डॉ. न. म. जोशी, प्रा. मिलिंद जोशी, अरुण खोरे, संजय सोनवणी, अंजली कुलकर्णी, डॉ. विद्या देवधर, ज्योती कदम, सुवर्णा जाधव, वासुदेव कुलकर्णी, डॉ. श्रीपाल सबनीस, सदानंद भणगे, डॉ. सच्चिदानंद शेवडे, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. भास्कर बडे, पराग करंदीकर, श्रीपाद ब्रह्मे, विकास पाटील, श्रीनिवास वारुंजीकर, श्रीराम पचिंद्रे, स्वप्निल पोरे, समीर नेर्लेकर, चंद्रलेखा बेलसरे, प्रा. द. ता. भोसले, सुधीर जोगळेकर, उमेश सणस, स्वाती तोरसेकर, मनीषा वाणी, माधव गिर, आसावरी इंगळे, महेश मांगले, प्रशांत चव्हाण, पराग पोतदार, अशोक कुळकर्णी, प्रदीप नणंदकर, प्रल्हाद दुधाळ, सरिता कमळापुरकर, शेखर जोशी, विनोद श्रा. पंचभाई, मच्छिंद्र कामंत, सतीश देशपांडे, प्रा. बी. एन. चौधरी, प्रशांत जोशी, डॉ. रेणुकादास बारबिंड, सागर कळसाईत, डॉ. मुग्धा जोर्वेकर, नागेश शेवाळकर, विलास सिंदगीकर, मेनका धुमाळे, शांताराम डफळ, वसंत बंदावणे, रामदास केदार, रवी घाटे, अशोक जाधव, नरेंद्र नाईक, बबन मिंडे आणि इतर....

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : 'चपराक', ६१७, 'साईकृपा', पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com